27 APR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील संशोधनाला भारतीय पेटंट

## सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी केली उपकरणाची निर्मिती



कोल्हापूर, ता. २६ : सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विशेष पोर्टेबल उपकरणाची निर्मिती करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनाला नुकतेच भारतीय पेटंट मिळाले आहे.



शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक व सध्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्यासह सहाय्यक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ.गणेश निगवेकर, डॉ. क्रांतिवीर मोरे आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांचा या संशोधन कार्यामध्ये समावेश आहे.

सुगंधी वनस्पतींमधील तेल सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी निर्माण केलेल्या उपकरणासाठी हे पेटंट मिळाले आहे. या उपकरणामध्ये तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी अस्थिर सेंद्रिय संयुगे सेन्सर वापरला आहे. 'सेन्सर'चे



डॉ. आर. के. कामत



डॉ. गणेश निगवेकर

आउटपुट मायक्रो-कंट्रोलरद्वारे दिले जाते. तेव्हा सॅम्पलमधील तेलाचे प्रमाण दर्शविले जाते. हे उपकरण अगदी हाताच्या तळव्यावर मावण्याइतके असून, ते सहज हाताळता येते. प्रत्यक्ष चाचणीच्या ठिकाणीही त्यामुळे सहज



डॉ. क्रांतिवीर मोरे



डॉ. एम. एस. निंबाळकर

वापरता येते.सुगंधी वनस्पतींच्या लागवडीमधून होणारा नफा हा त्या वनस्पतीमधील तेलाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. हे तेलाचे प्रमाण वनस्पतीचे वय, हवामान आणि जमिनीची उत्पादनक्षमता आदी



डॉ. तुकाराम डोंगळे

घटकांवर अवलंबून असते. योग्य वेळी पिकाची काढणी केली तरच जास्त तेल मिळून नफा वाढू शकतो. परंतु, वनस्पतीमध्ये तेल योग्य प्रमाणात तयार झाले आहे की नाही, हे ओळखण्यासाठी उपलब्ध पद्धती अत्यंत खर्चिक व वेळखाऊ असल्याने तसेच त्या शेतकऱ्यांना उपलब्ध नसल्याने त्यांच्याकडून चुकीच्या वेळी पिकाची

उपकरण

कापणी केली जाते आणि नुकसान सोसावे लागते. या पार्श्वभूमीवर हे संशोधन महत्वाचे असल्याचे डॉ. निंबाळकर यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, सुगंधी वनस्पतींची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे संशोधन वरदान असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 APR 2023
पुढारी

# सुगंधी वनस्पती तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी पोर्टेबल उपकरणाची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना पेटंट

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विशेष पोर्टेबल उपकरणाची निर्मिती करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले असून या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक व सध्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्यासह सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश निगवेकर, डॉ. क्रांतिवीर मोरे आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांचा या संशोधना मध्ये समावेश आहे.

सुगंधी वनस्पतींमधील तेल सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी निर्माण केलेल्या उपकरणासाठी हे पेटंट मिळाले आहे. या उपकरणामध्ये तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी अस्थिर सेंद्रिय संयुगे सेन्सर वापरला आहे.



सेन्सरचे आऊटपुट मायक्रो-कंट्रोलरद्वारे दिले जाते, तेव्हा सॅम्पलमधील तेलाचे प्रमाण दर्शविले जाते. हे उपकरण अगदी हाताच्या तळव्यावर मावण्याइतके असून ते सहज हाताळता येते. प्रत्यक्ष चाचणीच्या ठिकाणीही त्यामुळे सहज वापरता येऊ शकते.

सुगंधी वनस्पतींच्या लागवडीमधून होणारा नफा हा त्या वनस्पतीमधील तेलाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. योग्य वेळी पिकाची काढणी केली तरच जास्तीत जास्त तेल मिळून शेतकऱ्यांचा नफा वाढू शकतो. परंतु वनस्पतीमध्ये तेल योग्य प्रमाणात तयार झाले आहे की नाही, हे ओळखण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पद्धती अत्यंत खर्चिक व वेळखाऊ असल्याने तसेच त्या शेतकऱ्यांना उपलब्ध नसल्याने त्यांच्याकडून चुकीच्या वेळी पिकाची कापणी केली जाते आणि त्यामुळे त्यांना प्रचंड नुकसान सोसावे लागते. यामुळेच बरेचसे शेतकरी सुगंधी पिकांच्या लागवडीपासून दूर चालले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या या अभिनव संशोधनामुळे थेट शेतामध्ये जाऊन या उपकरणाच्या सहाय्याने पिकामध्ये तेलाचे प्रमाण किती आहे, याचा अंदाज बांधता येणे शक्य आहे. हे उपकरण शेतामध्ये कितीही वेळा चाचणीसाठी वापरता येते. यामध्ये थोडा बदल करून इतर वनस्पतींच्या तेलाची चाचणी करता येऊ शकते. किंबहुना विविध वनस्पतींसाठी एकच उपकरण तयार करता येणेही शक्य आहे. भविष्यात याच्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या उपकरणाची अचूकता वाढवता येऊ शकते, अशी माहिती डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी दिली आहे.

### उपकरण शेतकऱ्यांसाठी वरदान : कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक चमूने सुगंधी वनस्पतींमधील तेलाची चाचणी करण्यासाठी विकसित केलेले पोर्टेबल उपकरण हा एक अत्यंत महत्त्वाचा शोध असून सुगंधी वनस्पतींची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. अशा समाजोपयोगी संशोधनाबद्दल सर्वच संशोधक अभिनंदनास पात्र आहेत, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

2 7 APR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुगंधी वनस्पतीतील तेल मोजण्यासाठी सेन्सर डिव्हाईस

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांची कामगिरी : विद्यापीठाच्या उपकरणाला मिळाले पेटंट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राज्यातील सुगंधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांना वनस्पतीतील तेलाची प्रमाण दाखवणारी पद्धती वेळखाऊ अन् खर्चिक होती. त्यामुळे शेतकरी सुगंधी वनस्पती शेतीपासून दूर जात होते, पण आता शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी सुगंधी वनस्पतीतील तेल मोजण्यासाठी स्पेशल पोर्टेबल सेन्सर डिव्हाईस उपकरण बनवले आहे. या उपकरणाला पेंटटही मिळाले आहे. त्यामुळे सुगंधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही 'गुड न्यूज' आहे.

सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विशेष पोर्टेबल उपकरणाची निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. विद्यापीठातील प्राध्यापक व सध्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्यासह सहाय्यक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश निगवेकर, डॉ. क्रांतिवीर मोरे आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांच्या टीमने हे उपकरण बनवले आहे.



**कोल्हापूर : सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विकसित केलेले उपकरण.**

सुगंधी वनस्पतींच्या लागवडीमधून होणारा नफा हा त्या वनस्पतीतील तेलाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. हे तेलाचे प्रमाण वनस्पतीचे वय, हवामान, जमिनीची उत्पादन क्षमता आदींवर अवलंबून असते. योग्य वेळी पीक कापणी केल्यास जास्तीत जास्त तेल मिळून शेतकऱ्यांचा नफा वाढू शकतो. परंतु वनस्पतीमध्ये तेल योग्य प्रमाणात तयार झाले आहे का, हे ओळखण्यासाठी उपलब्ध पद्धती अत्यंत खर्चिक, वेळखाऊ आहे. ती शेतकऱ्यांना उपलब्ध नसल्याने चुकीच्या वेळी पिकाची कापणी झाल्यामुळे त्यांचे नुकसान होत होते. परिणामी बरेच शेतकरी सुगंधी वनस्पती लागवडीपासून दूर निघाले होते.

हाताच्या तळव्यावर बसण्याइतके हे उपकरण लहान आहे. यामध्ये थोडा बदल करून अन्य वनस्पतींच्या तेलाची चाचणी करता येऊ शकते. विविध वनस्पतींसाठी एकच उपकरण तयार करता येणेही शक्य झाले आहे. भविष्यात याची अचूकता वाढवता येऊ शकते, अशी माहिती डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी दिली. स्पेशल पोर्टेबल सेन्सर डिव्हाईस उपकरण निर्मितीच्या संशोधक टीमला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन, सहकार्य लाभले.

### उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान : कुलगुरू डॉ. शिर्के

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक टीमने सुगंधी वनस्पतींमधील तेलाची चाचणी करण्यासाठी विकसित केलेले हे पोर्टेबल उपकरण हा अत्यंत महत्त्वाचा शोध आहे. सुगंधी वनस्पतीं उत्पादक शेतकऱ्यांसाठी ते वरदान ठरणार आहे. सध्या उपलब्ध चाचण्या शेतकऱ्यांना परवडत नाहीत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शेतात जाऊन तेथील वनस्पतीमधील तेलाचे प्रमाण या उपकरणाने मोजणे शक्य होणार आहे. त्यामुळे अकाली कापणीमुळे होणारे शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळले जाईल, असे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी स्पष्ट केले.

27 APR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुगंधी वनस्पतीतील तेलाचे प्रमाण मोजण्याच्या उपकरणास पेटंट


## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विशेष पोर्टेबल उपकरणाची निर्मिती करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले असून, या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक व सध्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनिश कामत यांच्यासह सहायक प्रा. डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश निगवेकर, डॉ. क्रांतिवीर मोरे आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांचा या संशोधन टीममध्ये समावेश आहे.

या उपकरणामध्ये तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी अस्थिर सेंद्रिय संयुगे सेन्सर वापरला आहे. सुगंधी वनस्पतींच्या लागवडीमधून होणारा नफा हा त्या वनस्पतीमधील तेलाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. हे तेलाचे प्रमाण वनस्पतीचे वय, हवामान आणि जमिनीची उत्पादनक्षमता आदी घटकांवर अवलंबून असते. योग्यवेळी पिकाची काढणी केली तरच जास्तीत जास्त तेल मिळून शेतकऱ्यांचा नफा वाढू शकतो; परंतु वनस्पतीमध्ये तेल योग्य प्रमाणात तयार झाले आहे की नाही, हे ओळखण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पद्धती अत्यंत



खर्चिक व वेळखाऊ असल्याने तसेच त्या शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याने त्यांच्याकडून चुकीच्या वेळी पिकाची कापणी केली जाते आणि त्यामुळे त्यांना प्रचंड नुकसान सोसावे लागते. यामुळेच बरेचसे शेतकरी सुगंधी पिकांच्या लागवडीपासून दूर चाललेले आहेत; मात्र आता शिवाजी विद्यापीठाच्या या अभिनव संशोधनामुळे थेट शेतामध्ये जाऊन या उपकरणाच्या साहाय्याने पिकामध्ये तेलाचे प्रमाण किती आहे, याचा अंदाज बांधता येणे शक्य आहे. यामध्ये थोडा बदल करून इतर वनस्पतींच्या तेलाची चाचणी करता येऊ शकते.

### संशोधन शेतकऱ्यांसाठी वरदान

हा एक अत्यंत महत्त्वाचा शोध असून, सुगंधी वनस्पतींची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. अशा समाजोपयोगी संशोधनाबद्दल सर्वच संशोधक अभिनंदनास पात्र आहेत, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली आहे.

भविष्यात याच्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या उपकरणाची अचूकता वाढवता येऊ शकते, अशी माहिती डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी दिली आहे.

लोकमत

# विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने 'मोबाइल जर्नालिझम' या विषयावर आज, गुरुवारी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मोहसीन मुल्ला, शेखर पाटील, दूर्वा दळवी या मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणाऱ्या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

अनसंपर्क कक्ष

27 APR 2023 लोकमत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि वसतिगृहाचा लाभ घ्यावा

## शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव शिंदे यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

चंदगड : महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण करून ते उच्चशिक्षित व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने त्यांच्यासाठी शुल्कमध्ये सवलत जाहीर केली असून, याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

सीमाभागातील ८६५ गावांत आजही मराठी भाषेलाच प्राधान्य दिले जाते. कर्नाटकात कन्नड भाषेच्या सक्तीमुळे अनेकजण शिक्षण प्रवाहातून बाहेर पडले आहेत. त्यामुळे त्यांना परत शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून नेहमीच प्रयत्न केले जातात. त्याचाच भाग म्हणून शिवाजी विद्यापीठाने ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी अनुदानित अभ्यासक्रमांसाठी संपूर्ण ट्यूशन फी व विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के ट्यूशन फी माफ केली आहे. वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात फी माफ करण्यात आली आहे.

### कार्यशाळेचे आयोजन

सीमाभागातील विद्यार्थ्यांकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. याचा लाभही घ्यावा. याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश प्रक्रिया असणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ८ ते ११ मे या कालावधीत ही परीक्षा होणार आहे. त्याकरिता अर्ज करण्यासाठी २९ एप्रिलपर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे. प्रवेश प्रक्रिया नसलेल्या अभ्यासक्रमांसाठी अंतिम मुदत कळविण्यात येणार आहे.

पुढारी



कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित परिसंवादात बोलताना ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर. शेजारी प्रा. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अवनीश पाटील आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# महर्षी शिंदे बहुजनवादी राजकारणाचे प्रणेते

## डॉ. चौसाळकर; विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे बहुजनवादी राजकारणाचे प्रणेते होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष जयंती निमित्त 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि विविध चळवळी' या विषयावरील परिसंवादात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, जहाल आणि मवाळ सामाजिक सुधारणांचा समन्वय शिंदे यांच्या राजकीय दृष्टीत दिसून येतो. महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात राष्ट्रीय एकात्मतेला शिंदे यांनी महत्त्व दिले.

परिसंवादात डॉ. अवनीश पाटील यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि धर्मसुधारणा चळवळ व रमेश चव्हाण यांनी महर्षी शिंदे आणि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी या विषयावर मांडणी केली.

प्रास्ताविक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. २७) मोबाईल जर्नालिझम या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत ही कार्यशाळा जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या इमारतीमध्ये होणार आहे. कार्यशाळेकरिता विद्यार्थी, संशोधक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या पाच अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमातील बॅचरल ऑफ फार्मसी, बी.एड, एम. एड., इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन परीक्षा बुधवारी सुरळीत झाल्या. तसेच बुधवारी एम.ए. मास कम्युनिकेशन सेमीस्टर १ व २, एम. ए. इंग्रजी सेमीस्टर १, एम.ए. होमसायन्स सेमीस्टर १, एम. ए. संस्कृत सेमिस्टर १ या ५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषीत करण्यात आले. आजपर्यत ५२२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा, मुल्यमापन मंडळाकडून देण्यात आली.

तरूण भारत

# विद्यापीठात आज विविध अभ्यासक्रमांसाठी आरपीई परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, भूगोल विभागात गुरूवारी २७ रोजी पब्लिकेशन ऑफ इथिक्सची प्रवेश परीक्षा १२ ते १ या वेळेत होणार आहे. मराठी हिंदी, इंग्रजी, मॅथेमॅटिक्स, मायक्रोबॉयॉलॉजी, होम सायन्स, कॉम्प्युटर सायन्स, कॉमर्स, सोशालॉजी, फिलॉसॉफी, बायोटेक्नॉलॉजीची इंटरन्स टेस्ट प्रवेश परीक्षा होणार आहे. राजशास्त्र, पर्यावरणशास्त्र, लॉ, एजीपीएम. बिझनेस इकॉनॉमिक्स, बायोकेमिस्ट्री, बिझनेस मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, लायब्ररी सायन्स आणि इन्फॉर्मेशन सायन्स, भुगोल आणि फुड सायन्स आणि टेक्नॉलॉजीच्या आरपीई परीक्षा होणार आहे.

तरुण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# शिवाजी विद्यापीठात आज मोबाईल जर्नालिझमवर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापिठातील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने गुरुवारी, २७ रोजी सकाळी ११ वाजता 'मोबाईल जर्नालिझमवर कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळेत 'डिजिटल पत्रकारिता आणि मोबाईलचा वापर', 'न्यूज पोर्टलसाठी मोबाईल जर्नालिझम' आणि 'टेलिव्हिजन बातमीदारीसाठी मोबाईलचा वापर' यावर माध्यमतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. यामध्ये विद्यार्थी संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.